MHKO100007182013

<u>**रे.क.नं. २००/२०१३ मधील निशाणी क्र.८४ वरील आदेश**</u>
**(वसंत कुरळे वि. सिदगोंडा पाटील)**

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२ शिवगोंडा उर्फ फदू सातगोंडा पाटील यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, क्र.२ शिवगोंडा उर्फ फदू सातगोंडा पाटील हे दिनांक १६/०६/२०२५ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद हेच सरळ व कायदेशिर वारस आहेत. प्रतिवादी क्र. २ यांच्या वारसांना रेकॉर्डवर घेवून त्याबाबतची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

**२.** प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ चे वारस २ब व २क यांच्या वयाचा पुरावा याकामी वादीने दाखल केलेला नाही. तेव्हा योग्य तो आदेश व्हावा. वादीना वयाचा पुरावा देण्यासंबंधी आदेश करण्यात यावा. वारस रेकॉर्डवर घेण्यास कॉस्ट रू.५०००/- करण्यात यावी.

**३.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**४.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी क्र.२ शिवगोंडा उर्फ फदू सातगोंडा पाटील यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. वादी यांनी निशाणी ८१ चे वर्णन यादीसोबत प्रतिवादी

क्र. २ यांचा मृत्यू दाखला दाखल केला आहे. वादी यांचा वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेबाबतचा अर्ज व प्रतिवादी क्र. २ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी दाव्यात प्रतिवादी क्र.२ यांच्या वारसाबाबत योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत त्याच दिवशी दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.12.01 17:29:21 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०१/१२/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज